भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०६/२०१८

**१) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद : –**

सन २०१३ वर्षापासुन ते आज पर्यत यातील फिर्यादीस आरोपीतांनी संगनमत करून 'आमचे वंसाला २ मुले मिळाली आता तुझी गरज नाही' असे बोलुन जेवन न देता मारपीट करून तसेच मानसीक व शारीरीक त्रास देतात अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टे'ान लाखनी हे करीत आहेत.

**२) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद : –**

मे २०१६ पासुन ते आज पर्यत यातील फिर्यादीचे लग्न जातीरिवजा प्रमाणे आरोपी क्र. १ यांचे घरी नांदत असतांनी यातील आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस १ लाख रूपये घेवुन ये म्हणुन मारपीट केली माहेरून हुंडा न आनल्याने आरोपी क्र. १ ते ७ यांनी मारपीट करून शारीरीक व मानसीक त्रास देवुन छळ केल्याने फिर्यादीची लेखी रिपोर्ट व महिला आपतग्रस्त सल्ला व मार्गर्शन केंद्र साकोली यांचे लेखी पत्रावरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) निष्काळजीणे मोटार सायकल चालवुन एस.टी. बसला धडक मारून स्वत: गंभिर जखमी व मागे बसलेला मुलाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २८/०६/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा एसटी बस क्र. एमएच ४० वाय ५९८० ने भिवसनटोला गावाकडुन मालुटोला कडे जात असतांना विरूध्द दिशेने येणारी मोटार सायकल आडवी–तीडवी चालवीत आणत असल्याचे पाहुण फिर्यादीने त्याचे ताब्यातील बस रोडवर थांबवीली असता आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे फिर्यादीचे बसला समोरून धडक देवुन स्वत: गंभिर जखमी होण्यास व त्याचे सोबत मागे बसलेल्या मुलाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी धनिवंत गोवींदा चामलाटे वय ४५ वर्ष रा. पलाडी चालक साकोली डेपो यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८. भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) विजेची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक १७/०५/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी यांनी सहकार्यासह आरोपीचे घरी विद्युत चोरी बाबत रेड घातली असता मिटर क्र. ४३५५७००२००९५ या मिटरवर ११६४७९८ क्र. चे मिटरवर, विज खांबावरून सर्वीस वायर मिटरला जोडण्यापुर्वी स्लॉबच्या खाली सज्ज्यावर्ती कापुन त्यातील फेस व न्युटल वायरला २ अतिरिक्त दुसरे वायर घरातील विज फिटींगला जोडुन विज वापरून लबाडीने व अवैधपणे विज वापर करून महा वितरण कं. एकुण १५५४ युनीट कि. ११९९४/रु. ची विजेची चोरी केल्याने फिर्यादी सत्यदेव जगनानाथराव पेगलापट्टी वय ४८ वर्ष अतिरिक्त कार्याकारी अभियंता म.रा.वि.वि.क. मर्या. फिरते पथक गोंदीया यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ भारतीय विद्युत कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) एच.पी. किर्लोस्कर कंपनीची मोटार व नॉयलान रस्याची चोरी : —

दिनांक २७/०६/२०१८ चे ०९.०० ते दि. २८/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे शेत शिवारातील विहीरीवर लावलेली ०३ एच.पी. किर्लोस्कर कंपनीची मोटार कि. ९,०००/रु. ची व मोटारला बांधलेला नॉयलॉन रस्सा कि. ६,००/रु.चा असा एकुण ९,६००/रु. चा माल चोरून नेंल्याने फिर्यादी देवराम मुरारी कंळबे वय २७ वर्ष रा. गिरोला / कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) सबमर्सीबल मोटारपंप , केसींग पाईप व केबल वायरची चोरी : —

दिनांक २७/०६/२०१८ चे पुर्वी यातील कोणीतरी अज्ञात चोराने भुताई खोलीत लावलेली सबमर्सीबल मोटार पंप, केसींग पाईप, व केबल वायर असा एकुण २५,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी प्रभाकर सदाशिव पटले वय ५० वर्ष रा. मासलमेटा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

७) क्षुल्लक कारणावरून भांडण करून काठने डोक्त्रावर मारून जखमी करून मारण्या—पीठण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद: —

दिनांक २८/०६/२०१८ चे १४.०० वाजता यातील फिर्यादी हा 'आमच्या घरी नागपुर ला का आला होता' म्हणुन विचारण्यास आरोपीचे घरी जात असतांना आरोपी क्र. १ ने भांडण करून काठीने डोक्यावर मारून जखमी केले व आरोपी क्र. २ ने मारण्या—पीटण्याची धमकी दिल्याने जखमी फिर्यादी गिरधर टिकाराम मोदनकर वय ४५ वर्ष रा. मानकापुर जातनगर कोराडी रोड नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

८) इसमाचा मृत्यु :—

दिनांक २८/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा यातील मृतकचा लहान भाऊ असुन फिर्यादी हा आपल्या शेतात काम करीत असतांना मृतक पुरूषोत्तम प्रभुदास दिघोरे वय ३५ वर्ष रा. पिंडकेपार यास बोलावीले असता यातील फिर्यादी व मृतक शेताचे धु—यावर गोष्टी करीत असतांना मृतक अचानक खाली पडल्याने फिर्यादी व त्याचे घरचे लोकांनी औषधोपचारा करीता उपजिल्हा रूग्नालय साकोली येथे आनले असता तेथील डॉक्टरांनी मृतक यास तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी पंकज प्रभुदास दिघोरे वय २५ वर्ष रा. पिंडकेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

९) सर्वीस वायरचे करंट लागुन इसमाचा मृत्यु :—

दिनांक २८/०६/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मृतक भाऊ ओमकुमार अर्जुनजी खंगार वय ४६ वर्ष रां. आंबेडकर वार्ड वरठी हा सेंट्रींगचे कामा करीता मजुरीने आले असता सेट्रींगचे काम करीत असतांना सर्विस वायरचे करंट लागुन मरण पावल्याचे फिर्यादी सौ. अनिता शामराव बावणे वय ४६ वर्ष रा. हणुमान वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) खदानीच्या पाण्यात ऊडी घेवुन मुलीचा मृत्यु :–**

दिनांक २८/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील मृतक कु. सुरेखा संतकुमार कुभंरे वय १९ वर्ष रा. फुटाळा ही घरी कुणालाही न सांगता गावाचे बाहेर असलेल्या खदानीच्या पाण्यात काहीही कारण न सांगता धावत जावुन स्वत: खदानीच्या पाण्यात ऊडी घेवुन मरण पावल्याने फिर्यादी नितीन प्रेमलाल वलके वय ३२ वर्ष रा. खैरलांजी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**११) ओ.पी. पॉयझनींग प्राशन करून उपचरादरम्यान युवकाचा मृत्यु:–**

दिनांक २५/०६/२०१८ चे १२.०६ वाजता दरम्यान यातील मृतक पंकज जगदिश जांभुळकर वय २१ वर्ष रा. परसोडी, याने ओपी.पॉयझनींग प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती केले असता दि. २५/०६/२०१८ ला उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कांबळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**१२) उपचरादरम्यान इसमाचा मृत्यु:–**

दिनांक १७/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक अमोल मुरलीधर पोहनकर वय २५ वर्ष रा. गायडोंगरी हा त्याची मोटार सायकल क्र एमएच ३५/३०९५ ने सोबत गुणवंत गजभिये यास मागे बसवुन निलज फाटयावरून गावी जात असतांना अचानक मोटार सायकल स्लिप होवुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती असतांनी उपचारादरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. बिसने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. लांजेवार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१३) थिमेट प्राशन करून इसमाचा मृत्य:–**

दिनांक १७/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक अशोक रामकृष्ण मारवाडे वय ४० वर्ष रा. गांधीवार्ड एकलारी याने त्याचे राहते घरी थिमेट प्राशन करून मरण पावल्याने फिर्यादी अश्विन रामकृष्ण मारवाडे वय २८ वर्ष रा. गांधी वार्ड एकलारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**१४) आमरोड वर येणा--या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २८/०६/२०१८ चे १९.०० ते १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे वाहन ही बावणकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वडीकर पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.